नि.दि.दा.क्र. ९३/२०१६
विजय व इतर वि. मारूती व इतर

## निशाणी क्र.३५ वरील आदेश

वादींनी सदरचा अर्ज मयत प्रतिवादी क्र.१ चे वारस रेकॉर्डवर घेण्यासाठी दाखल केला आहे. वादींचे असे कथन आहे की, वादींनी प्रस्तुतचा दावा प्रतिवादीं विरुध्द जाहीर ठराव, वाटप व पृथक कब्जा मिळणेकरीता दाखल केला आहे. प्रतिवादी क्र.१ मारुती कृष्णा गायकवाड हे दि.१०.०५.२०२१ रोजी मयत झाले आहेत. सदरील प्रतिवादीचे वारस कायद्याचे दृष्टीने रेकॉर्डवर घेणे गरजेचे व जरुरीचे आहे. त्यांना अर्जात नमुद केलेले कायदेशीर वारस आहेत. या व्यतिरीक्त त्यांना अन्य कोणीही वारस नाहीत. दाव्याचा गुणावगुणावर निकाल होणेसाठी सदरचे वारस रेकॉर्डवर घेणे आवश्यक आहे. सबब, वादींनी प्रतिवादी क्र.१ चे अर्जात नमुद वारस रेकॉर्डवर घेणेकामी सदरचा अर्ज दाखल केला आहे.

२. प्रतिवादींनी सदर अर्जावर नि.क्र.४७ वर म्हणणे दाखल करून अर्जातील कथने नाकारलेली आहेत. त्यांचे असे म्हणणे आहे की सदरचे वारस रेकॉर्डवर घेण्यासाठी विलंब झालेला आहे. सदरचे वारस मुदतीत रेकॉर्डवर घेतलेले नसल्याने अर्ज नामंजूर करण्यात यावा. यदाकदाचित तो मंजूर करणेचा झाल्यास तो खर्चासह मंजूर करण्याची विनंती केली आहे.

३. वादी व प्रतिवादींतर्फे विधिज्ञांचा युक्तिवाद ऐकण्यात आला. सदरचा दावा हा वादीने प्रतिवादी विरूध्द जाहीर ठराव, वाटप व पृथक कब्जा व निरंतर ताकीदीकरीता दाखल केला आहे. प्रतिवादी क्र. क्र.१ मारूती कृष्णा गायकवाड हे दि.१०.०५.२०२१ रोजी मॅप्रो कोविड सेंटर शेंदुरजणे, तालुका वाई येथे मयत झाले आहेत. त्यांच्या मृत्यूच्या दाखल्याची प्रत नि.क्र.३८ सोबत दाखल केली आहे. सदरचा दावा गुणावगुणावर निकाली होणे गरजेचे व आवश्यक आहे. न्यायतत्वाच्या दृष्टीकोनातून दाव्याचे स्वरुप पहाता प्रस्तूत प्रतिवादी क्र.१ चे वारसांना रेकॉर्डवर घेणे आवश्यक वाटते. त्यांना अशी संधी दिल्यास वाद मुद्दयांचे निवारण गुणवत्तेवर होणार आहे. त्यांना अशी संधी नाकारल्यास नैसर्गिक न्यायतत्वाचे विरुध्द होईल. त्यामुळे नैसर्गिक न्यायतत्वाचे विरुध्द प्रतिवादी क्र.१ चे वारसांना मयत प्रतिवादीचे वारस म्हणून घेण्याची संधी नाकारल्यास त्यांना न्यायदान नाकारल्यासारखे होणार आहे. त्याकरीता त्यांचे वारस रेकॉर्डवर घेणे

आवश्यक आहे. परंतु झालेल्या विलंबाचे अनुषंगाने खर्चाबाबत आदेश करणे जरुरीचे आहे. सबब, प्रस्तूतचा अर्ज खर्चासह मंजूर होणेस पात्र आहे असे मला वाटते. परिणामी, मी खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे:

<u>आदेश</u>

१. अर्ज (नि.क्र.३५) मंजूर करण्यात येतो.

२. वादींनी नि.क्र.३३ वरील पुर्तता केल्यानंतर प्रतिवादी क्र.१ चे वारस रेकॉर्डवर घेण्यात येतात.

RAVINDRA MADHUKARRAO BHENDE

Digitally signed by RAVINDRA MADHUKARRAO BHENDE
Date: 2024.04.20 11:26:03 +0530

स्थळ : वाई (आर.एम.भेंडे)
दिनांक : १२.०४.२०२४ दुसरे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर वाई.